## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) २०२४

## सराव परीक्षा प्रश्नपत्रिका–क्र. २

**पेपर क्र. १ विषय : प्रथम भाषा व गणित माध्यम : मराठी वेळ : 11.00 ते 12.30**

**बैठक क्रमांक : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ एकूण गुण : 150**

### विभाग – I

### मराठी

**1. 'श्यामची आई' हा चित्रपट कोणी काढला ?**

1) आण्णाभाऊ साठे 2) साने गुरुजी 3) आचार्य प्र.के.अत्रे 4) बा.सी.मर्ढेकर

**2. 'दिग्विजय' या शब्दात एकूण किती ऱ्हस्व अक्षरे आहेत.**

1) दोन 2) तीन 3) पाच 4) चार

**3. 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र कोणाचे आहे ?**

1) यशवंतराव चव्हाण 2) वि.स.खांडेकर 3) आण्णाभाऊ साठे 4) प्रा.व.बा.बोधो

**4. संधीयुक्त शब्दांचे चार पर्याय दिले आहेत योग्य उत्तराचा क्रमांक लिहा ?**

**सत्+ शिष्य**

1) सशिष्य 2) सधिष्य 3) सच्छिष्य 4) सच्छिष्य

**5. 'पक्षी आकाशात उडाले 'अधोरेखित शब्दाचा क्रियापद प्रकार ओळखा**

1) सकर्मक 2) अकर्मक 3) शक्य 4) प्रयोजक

**6. 'पंढरपूरला वारकरी चालत जातात ' या वाक्याचा प्रयोग ओळखा**

1) कर्मणी 2) अकर्मक कर्तरी 3) सकर्मक कर्तरी 4) अकर्मक भावे

**7. नामाबद्दल विशेष माहिती सांगून त्याची व्याप्ती मर्यादित करतो अशा शब्दास काय म्हणतात ?**

1) सर्वनाम 2) विशेषनाम 3) विशेषण 4) क्रियापद

**8. 'माझा डबा जवळ जवळ शेवटचा असल्याने त्यात उतारुंची ये–जा झाली नाही' वाक्य प्रकार ओळखा.**

1) संयुक्त 2) होकारार्थी 3) मिश्र 4) केवल

**प्रश्न : 9 ते 11 साठी सूचना :–**

**उतारा वाचून त्या खालील विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा.**

आनंद हा मानसिक असतो तो बाह्यगोष्टीत न शोधता आपल्यामध्ये शोधा. जीवनात येणाऱ्या लहान सहान गोष्टीतून आनंद शोधण्याचा प्रयत्न करा. सतत ताणाखाली राहून मानसिक संतुलन ढळू देऊ नका. आपल्याकडे जे आहे त्यावर संतुष्ट राहा. कारण सगळ्याच गोष्टी आपल्या मनासारख्या घडत नसतात. आयुष्यात त्रास होतच असतो, त्याचे प्रमाण कमी कसे करता येईल ते शोधा. आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहा. बदल स्वीकारण्याची तयारी ठेवा. भविष्याच्या चिंतेने वर्तमान बिघडू देऊ नका. आपल्या आवडीच्या कामात व्यग्र राहा. आपल्या दु:खाचे भांडवल न करता दुसऱ्याचे दु:ख जाणून घेण्याचा प्रयत्न करा.आपोआप तुमचे दु:ख कमी होईल. इतरांशी आपली तुलना किंवा बरोबरी करीत नाशिबाला दोष न देता स्वत:ला भाग्यशाली समजून जीवनाचा आनंद घ्या.

**9. वरील उताऱ्यावरुन पुढीलपैकी असत्य विधान कोणते ?**

1) मनासारख्या न घडणाऱ्या गोष्टीचा त्रास होतो. 2) जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे.
3) आनंद हा बाह्यगोष्टीत शोधावा. 4) बदल स्वीकारण्याची तयारी ठेवावी.

**10. आपला वर्तमान कोणत्या गोष्टीमुळे बिघडू शकतो ?**

1) नशिबाला दोष दिल्याने 2) आयुष्यात त्रास झाल्याने
3) दुसऱ्याखे दु:ख जाणून घेतल्याने 4) भविष्याच्या चिंतेने

**11. आनंद हा.......................**

1) बाह्यगोष्टीत शोधावा 2) मानसिक असतो
3) दुसऱ्याला त्रास देण्यात मिळतो 4) केवळ स्वत:च्याच सुखात असतो

**12.** **मराठी भाषेत एकूण मूळ वर्ण किती आहेत.**

1) ३५ 2) ३० 3) ४८ 4) ५०

**13.** **'त' या व्यंजनापुढे 'ज' किंवा 'झ' आल्यास 'त' बद्दल 'ज' होतो. (खालीलपैकी योग्य पर्याय निवडा)**

1) आजादी 2) जगन्नाथ 3) उज्ज्वल 4) सन्मती

**प्रश्न 14 ते 16 साठी सूचना :–**

**खालील संवाद वाचून त्यातील दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे दिलेल्या पर्यायातून निवडा (१४ ते १६ साठी सूचना)**

**"तो रस्त्यावरुन चालणारा रेडा आणि तू समान आहेस."**

**रेड्याकडे बोट दाखवून मुख्य पंडीत म्हणाले, "हो", गप्प बसलेला ज्ञानदेव पुढे येत म्हणाला "हो, काय ? त्याला शिंगे आहेत. चार पाय आहेत. तुला आहेत ?" हा शारीरिक भेद झाला. त्याचा आणि माझा आत्मा एक आहे.**

**"वृथा वाद कशाला ? बळवंत शास्त्री सांगत होते की, तुम्ही मुले वेद अचूक म्हणता, तो रेडा म्हणू शकेल का वेद ? "बोलवा त्याला." ज्ञानदेव म्हणाला 'एऽ पखाल्या नाव काय रे तुझ्या रेड्याच ?" पखाल्यानं नाव सांगताच मुख्य पंडित म्हणाले. 'बघ तुझं' नि त्याचं नाव सारखच आहे !" सारी सभा प्रचंड हसली पाहता, पाहता रेडा वेद म्हणू लागला. सर्वांनी एकमुखांनी जयजयकार केला....ज्ञानेश्वर महाराजांचा विजय असो !"**

**14 .** **संवादात प्रत्यक्ष किती लोकांनी भाग घेतला आहे ?**

1) दोन 2) तीन 3) पाच 4) या पेक्षा जास्त

**15.** **मुख्य पंडीताचा स्वभाव कसा आहे ?**

1) रागीट 2) विनोदी 3) प्रेमळ 4) अहंकारी

**16.** **ब्रह्मसभा प्रचड हसली कारण –**

1) रेडा वेद अचूक म्हणू लागला
2) रेड्याचा आणि ज्ञानदेवाचा आत्मा एक होता
३) मुख्य पंडित रागावला.
4) ज्ञानदेवाचं आणि रेड्याचं नांव एकच होतं

**17.** **सर्व स्वर व स्वरयुक्त व्यंजनाना काय म्हणतात.**

1) वर्ण 2) अक्षर 3) व्यंजन 4) कठोर वर्ण

**18.** **पुनर्जन्म (संधी ओळखा)**

1) पुन+जन्म 2) पुनर+जन्म 3) पुन्ह+ जन्म 4) पुन्हा+जन्म

**19.** **'भोळा' या शब्दाचे भाववाचक नाम कोणते ?**

1) भोळसर 2) भोळसट 3) भोळेपणा 4) भोळी

**20** **'उदरनिर्वाह' या शब्दाच्या समानार्थी शब्दाचा पर्याय क्रमांक निवडा ?**

1) चरितार्थ 2) उदरभरण 3) क्षुधाशांती 4) जेवणखाना

**21.** **पुढीलपैकी अशुद्ध शब्द ओळखा.**

1) कोटिकोन 2) किटकभक्षि 3) लघुत्तम 4) क्रीडांगण

**22.** **पुढीलपैकी चुकीच्या अर्थाचा अलंकारिक शब्द ओळखा**

1) गळ्यातला ताईत–अत्यंत प्रिय
2) टोळभैरव – कामात नासाडी करणारे लोक
३) घाशीराम कोतवाल– न्यायी मनुष्य
4) बाळकडू– लहानपणीचे संस्कार

**23.** **पुढीलपैकी निश्चितपणे अनेकवचनी नामे कोण कोणती ?**
**(दोन अचूक पर्याय निवडा)**

1) साचा 2) काचा 3) भाचा 4) टाचा

**24.** **................ फिरुन कार्यकर्ते प्रचार करीत होते**
**(दोन उत्तरे नोंदवा)**

1) जंगल–जंगल 2) वर्गावर्गात 3) गल्लोगल्ली 4) प्रत्येक वार्डामध्ये

**25.** **'दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ पर्यायातून निवडा.**

1) भांडे नसल्याने ओंजळीने पाणी पिणे
2) दुसऱ्याने पाणी पाजणे
3) दुसऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे वागणे
4) दुसऱ्याला सांगून पाणी पिणे.

## विभाग – II

### गणित

26. खालीलपैकी अपरिमेय संख्या कोणती? (दोन अचूक पर्याय निवडा)

1) $\sqrt{636}$ 2) 1.41 3) 3.467549...... 4) $\sqrt{441}$

27. ( $x$ +5) ही सम संख्या आहे तर तिच्यामागील 10 वी विषम संख्या कोणती ?

1) $x-10$ 2) $x-14$ 3) $x-12$ 4) $x-16$

28. $\frac{7}{4}$ ची बेरीज व्यस्त व $\frac{4}{7}$ ची गुणाकार व्यस्त संख्या यांची बेरीज किती ?

1) 1 2) $\frac{7}{16}$ 3) ० 4) $\frac{-7}{16}$

29. दोन संख्यांचा गुणाकार 270 व मसावि 3 आहे तर त्यापैकी लहान संख्या कोणती ?

1) 18 2) 12 3) 24 4) 15

30. जर $81 = 27^{x}$ तर $x$ = किती ?

1) $\frac{3}{4}$ 2) 3 3) 1 4) $\frac{4}{3}$

31. ****** ही सहा अंकी विषम संख्या आहे सर्व * ची किंमत समान आहे तर पुढीलपैकी त्या संख्येचे विभाजक कोणते? (दोन अचूक पर्याय निवडा)

1) $9^0$ 2) 3 3) 6 4) 8

32. $19.2 \div 0.0016$ = किती ?

1) 12 2) 0.0012 3) 0.012 4) 12000

33. $2^x + 2^y + 2^z = 13$ तर $x+y+z$ = किती ?

1) 3 2) 5 3) 4 4) 6

34. तीन संख्यांचे गुणोत्तर 2 : 3 : 4 आहे व त्यांची बेरीज 162 आहे तर त्या संख्या कोणत्या ?

1) 36,54,72 2) 40,42,80 3) 42,58,62 4) 20,30,40

35. $x \alpha y$ जर $x = 6.8$ तर $y = 1.7$ तर चलनाचा स्थिरांक काढा

1) 40 2) 0.4 3) 4 4) 17

36. बरोबर 3.30 वाजता घड्याळाच्या मिनीटकाटा व तासकाटा यांच्यात किती मापाचा कोन होईल ?

1) $60^0$ 2) $70^0$ 3) 14 4) 16

37. दोन समांतर रेषांना दोन रेषांनी छेदले असता संगत कोनांच्या किती जोड्या तयार होतील ?

1) 8 2) 12 3) 14 4) 16

38. पहिल्या पाच सम नैसर्गिक संख्यांची सरासरी किती ?

1) 2 2) 6 3) 8 4) 5

39. चक्रिय चौकोनात एका कोनाचे माप त्याच्या संमुख कोनाच्या मापाच्या $\frac{1}{2}$ पट आहे तर त्या कोनाचे माप काढा ?

1) $60^0$ 2) $80^0$ 3) $100^0$ 4) $120^0$

40. एका त्रिकोणाच्या कोनांची मापे 2 : 3 : 5 या प्रमाणात असतील तर तो त्रिकोण कोणत्या प्रकारचा असेल. ? (दोन अचूक पर्याय निवडा)

1) लघुकोन त्रिकोण 2) काटकोन त्रिकोण 3) विशालकोन त्रिकोण 4) विषमभूज त्रिकोण

**41.** **पुढीलपैकी पायथॅगोरसची त्रिकुटे ओळखा ?**
**(दोन अचूक पर्याय निवडा)**

**1)** (3,4,7) **2)** (9,12,15) **3)** (9,40,41) **4)** (12,15,17)

**42.** **एका चौरसाच्या कर्णाची लांबी $8\sqrt{2}$ सेमी आहे तर त्या चौरसाची परिमीती किती से.मी. असेल ?**

**1)** 30 **2)** 34 **3)** 33 **4)** 32

**43.** **पुढीलपैकी कोणत्या चौकोनाचे कर्ण परस्परांना काटकोनात छेदत नाहीत ?**

**1)** पतंग **2)** समलंब चौकोन **3)** आयत **4)** चौरस

**44.** **दोन वर्तुळांच्या परिघांचे गुणोत्तर 4:3 आहे तर त्यांच्या क्षेत्रफळांचे गुणोत्तर किती ?**

**1)** 4:3 **2)** 16:3 **3)** 16:9 **4)** 9:16

**45.** **एका कोनाचे माप त्याच्या कोटीकोनाच्या मापाच्या $\frac{1}{2}$ पट आहे तर त्या कोनाच्या पूरककोनाचे माप काढा ?**

**1)** $100^{\circ}$ **2)** $30^{0}$ **3)** $60^{0}$ **4)** $150^{0}$

**46.** **50 मिलीलीटर × 100 मिलीलीटर = किती ? (दोन अचूक पर्याय निवडा)**

**1)** 5000 मि.ली. **2)** 50,000 मि.ली. **3)** 50 मि.ली. **4)** 5 लि.

**47.** **3 रीम कागदांपैकी 30 दस्ते कागद वापरले तर किती कागद उरले ?**

**1)** 800 **2)** 700 **3)** 720 **4)** 900

**48.** **बसच्या चाकाचा व्यास 2.8 मी. आहे तर 500 फेऱ्यात चाकाने कापलेले अंतर काढा. ? (दोन अचूक पर्याय निवडा)**

**1)** 44 कि.मी. **2)** 4.4 कि.मी. **3)** 44000 मी. **4)** 4400 मी.

**49.** **एका 18 से.मी. लांबी व 8 से.मी. रुंदी असणाऱ्या आयताची लांबी $\frac{2}{3}$ पट केली व रुंदी $\frac{3}{2}$ पट केली तर क्षेत्रफळावर काय परिणाम होईल. ?**

**1)** क्षेत्रफळ वाढेल **2)** क्षेत्रफळ तेच राहील **3)** क्षेत्रफळ कमी होईल **4)** यापैकी नाही

**50.** **एका समभूज चौकोनाच्या समुंख कोनांची मापे $(2x\text{-}10)^{\circ}$ व $(3x\text{-}25)^{\circ}$ आहेत तर x = किती ?**

**1)** 15 **2)** 25 **3)** 20 **4)** 30

**51.** **चुकीची जोडी ओळखा. (दोन अचूक पर्याय निवडा)**

**1)** **5** किमी = **50** हेक्टोमीटर **2)** 4 डेकाग्रॅम = 40 ग्रॅम

**3)** **2** सेंटीमीटर = **20** डेसीमीटर **4)** 3 डेकाग्रॅम = 30 हेक्टोग्रॅम

**52.** **समभूज त्रिकोणाची बाजू 16 से.मी. असल्यास त्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ काढा.**

**1)** $64\sqrt{3}$ चौसेमी **2)** $16\sqrt{3}$ चौ.सेमी. **3)** $32\sqrt{3}$ चौ.से.मी. **4)** 64 चौ.से.मी.

**53.** **एका घनाचे एकूण पृष्ठफळ 294 चौ.से.मी. आहे तर त्या घनाचे घनफळ काढा.**

**1)** 125 घ.मी. **2)** 243 घ.से.मी. **3)** 216 घ.मी. **4)** 343 घ.मी.

**54.** **21 से.मी. व्यासाच्या गोलाचे घनफळ काढा ?**


**1)** 4851 घ.से.मी. **2)** 63 घ.से.मी. **3)** 66 घ.से.मी. **4)** 261 घ.से.मी.

**55.** **8 मी. लांब, 10 मी. उंच व 2 मी. रुंद भिंत बांधण्यासाठी 20 x 40 x 10 से.मी. मिती असणाऱ्या किती विटा लागतील ?**

**1)** 16000 **2)** 20000 **3)** 18000 **4)** 22000

प्रश्न. 56 व 57 साठी सूचना

वृत्तलेखावरुन पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.

56. 

सर्वात जास्त विद्यार्थी संख्या कोणत्या तुकडीत आहे?

1) A　2) B　3) C　4) D

57. A तुकडीतील व D तुकडीतील मुलांचे गुणोत्तर किती ?

1) 15:14　2) 15:12　3) 14:15　4) 10:14

58. 10,7,8,12,9,6,5,11 या संख्यांचे मध्यमान काढा.

1) 8　2) 7.5　3) 8.5　4) 9

59. एका संख्येच्या $\frac{4}{5}$ म्हणजे किती टक्के ?

1) 60　2) 80　3) 70　4) 73.3

60. x चे 25 % = 2000 चे 50% तर x = किती (दोन अचूक पर्याय निवडा)

1) 4000　2) $4 \times 10^3$　3) $40 \times 10^3$　4) $400 \times 10^2$

61. टक्केवारीचे अपुर्णाकांत रुपांतर करा. 280% (दोन अचूक पर्याय निवडा)

1) $\frac{16}{5}$　2) $\frac{13}{5}$　3) $\frac{14}{5}$　4) 2.8

62. एका रकमेची सरळव्याजाने दसादशे 15% दराने दाम चौपट होण्यास किती काळ लागेल ?

1) 10 वर्षे　2) 20 वर्षे　3) 15 वर्षे　4) 12 वर्षे

63. एका शहराची लोकसंख्या 300000 आहे लोकसंख्या वाढीचा दर प्रतिवर्षी 10% असेल तर तीन वर्षानंतर लोकसंख्या किती असेल?

1) 399000　2) 400000　3) 399300　4) 350000

64. महेशने एक वस्तू 1635 रुपयास विकल्याने त्याचा 9% नफा झाला तर त्या वस्तूची किंमत काढा?

1) 1600 रु.　2) 1550 रु.　3) 1580 रु.　4) 1500 रु.

65. एका दुकानदाराला 18 वस्तूंच्या खरेदीवर 9 वस्तू मोफत मिळाल्या तर शेकडा किती टक्के सूट मिळाली ?

1) 25%　2) 40%　3) 60%　4) 50%

66. दुकानदाराने 30,000 रू.ची वस्तू 20,000 रुपयाला विकली तर शेकडा सुट किती दिली ?

1) 33%　2) 33.33%　3) 35%　4) 40%

67. $(x+6)(x-8)$ हे अवयव असणारी बैजीक राशी कोणती ?

1) $x^2-2x-48$　2) $x^2-2x+48$　3) $x^2+2x-48$　4) $x^2+2x+48$

68. $7x^2-2x+4$ या बहुपदीतून कोणती बहुपदी वजा केली असता $10x^2+5$ ही बहुपदी मिळेल?

1) $3x^2+2x+1$　2) $-3x^2-2x-1$　3) $3x^2-2x+1$　4) $-3x^2+2x+1$

69. $\frac{7.5 \times 7.5 - 7 \times 7.5 + 3.5 \times 3.5}{7\text{-}5 - 3.5}$ = किती ?

1) 3　2) 4　3) 5　4) 2

70. $(x^3-2x^3+5)$ व $(x^4-7x)$ या बहुपदींच्या गुणाकाराची कोटी किती ?

1) 12 2) 4 3) 6 4) 7

71. $16x^4-81$ चे अवयव कोणते ? (दोन अचूक पर्याय निवडा)

1) $(4x+9)(4x-9)$ 2) $(4x^2+9)(4x^2-9)$ 3) $(4x^2+9)(2x+3)(2x-3)$ 4) $(2x+3)^3(2x-3)$

72. जर $\frac{x+3}{4} = \frac{4x-2}{9}$ तर $x$ = ?

1) 5 2) -3 3) 3 4) 9

73. $9x^2+25y2$ ही राशी पूर्ण वर्ग होण्यासाठी कोणते पद मिळवावे ?

1) 9xy 2) 20xy 3) 30xy 4) 25xy

74. $27a^3-512b^3$ चे अवयव कोणते ?

1) $(3a+8b)(9a^2+24ab+64b^2)$ 2) $(3a-8b)(9a^2-24ab+64b^2)$

3) $(3a-8b)(9a^2-24ab+64b^2)$ 4) $(3a-8b)(9a^2+24ab+64b^2)$

75. $(7a+2b+c)$ ची बेरीज व्यस्त व $(5a+2b-5c)$ ची बेरीज व्यस्त यांची बेरीज किती ?

1) $4(3a+b-c)$ 2) $4(3a-b-c)$ 3) $-4(3a-b-c)$ 4) $-4(3a+b-c)$